# गोदावरी संवर्धन कक्ष विभाग

गोदावरी प्रदूषण जनहित याचिका क्र.१७६/२०१२ बाबत मा. आयुक्त, मनपा, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक मनपा स्तरावरील उपसमितीची बैठक **दि.३०/०९/२०२२ रोजीचे इतिवृत्त.**

**दि. ३०/०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** मा.आयुक्त सो. यांचे दालनात मा.उच्च न्यायालयात दाखल गोदावरी प्रदुषण जनहित याचिका क्र.१७६/२०१२ मधील मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी आजपावेतो दिलेले आदेश, त्या मुद्यांचा व नव्याने दि.१८/१२/२०१८ रोजी दिलेल्या निर्देशा बाबतचा, तसेच निरीने दिलेल्या शिफारशींचा, तसेच गोदावरी प्रदुषण नियंत्रणाबाबत चर्चा करणेसाठी नाशिक मनपा स्तरावरील उपसमितीची बैठक **दि.३०/०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.आयुक्त सो. यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यालय, मनपा, नाशिक** येथे आयोजित केली होती.

खालील सदस्य बैठकीस हजर होते.

| | |
|---|---|
| १. NEERI चे प्रतिनिधी | डॉ. नितीन गोयल, प्रिंसीपल सायन्टीस्ट, मुंबई. |
| २. पोलिस उपआयुक्त, नाशिक | API श्री. जी. आर. परचुरे |
| ३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कार्यालय | श्री. आर. पी. सुर्यवंशी/ श्री. एस.डी. मोहारे F.O. |
| ४. माहिती उपसंचालक, नाशिक | श्री. इंगवे |
| ५. उपआयुक्त (गो.सं.क),मनपा,नाशिक | - सचिव |
| ६. शहर अभियंता, सा.बा.वि. मनपा,नाशिक | - निमंत्रीत सदस्य |
| ७. अधिक्षक अभियंता, साआअ(मलनि:) मनपा, नाशिक | - निमंत्रीत सदस्य |
| ८. अधिक्षक अभियंता (यांत्रिकी), मनपा, नाशिक | - ---"---"--- |
| ९. उपआयुक्त,अतिक्रमण, मनपा, नाशिक | - ---"---"--- |
| १०. संचालक, घनकचरा व्यवस्थापन, मनपा, नाशिक | - ---"---"--- |
| ११. प्रशासनाधिकारी, मनपा, शिक्षण विभाग, नाशिक | - ---"---"--- |
| १२. कार्यकारी अभियंता पर्यावरण विभाग, मनपा, नाशिक | - ---"---"--- |
| १३. राजेश पंडित | - अशासकिय सदस्य |
| १४. श्री. निशिकांत पगारे | - ---"---"--- |

**सदर उपसमितीच्या बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर चर्चा झाली**

१. प्रथम : Petitioner श्री राजेश पंडित STP Upgradation & Storm Water व्दारे मलजल/नाले नदी मध्ये मिसळत असल्या बाबत मनपा काय उपाय योजना करत आहे या बाबत विचारले.

- त्या अनुषंगाने श्री चव्हाणके (अधिक्षक अभियंता) यांनी STP Upgradation चे DPR केंद्र शासनास (NRCD) सादर केलेले असुन त्यांची सुचविलेल्या सुचनांनुसार पुढिल कार्यवाही मनपामार्फत सुरु असले बाबत सुचित केले.

13.10

तसेच श्री. वंजारी (शहर अभियंता) यांनी पावसाळा पुर्वी ३ महिने सार्व.बांधकाम विभाग व मलनि:सारण विभागामार्फत एकत्रित सर्व्हे करुन पावसाळी गटारव्दारे सांडपाणी नाल्यात मिसळणारे ठि़काण शोधुन ते बंद करणेकामी कार्यवाही करणेत आल्याचे माहिती दिली.

२. श्री निशिकांत पगारे: ५० नाले गोदावरी नदीत सोडलेले आहेत त्यातले किती चालू आणि किती बंद आहेत?

- त्या अनुषंगाने श्री चव्हाणके (अधिक्षक अभियंता) यांनी Storm Water व्दारे नाल्यामध्ये मिसळणारे सांडपाणी बाबत विभागामार्फत सर्व्हे करुन एकूण ६० ठिकाणांचा शोध घेऊन पैकी ३५ ठिकाणी नाल्यात वाहणारे सांडपाणी बंद करणेत आल्याचे व उर्वरीत २५ ठिकाणी कार्यवाही पावसाळया नंतर हाती घेणार असल्याचे सुचित केले, असे नमूद केले.

३. श्री निशिकांत पगारे: वरुणा नदी (वाघाडी ) एसटीपी प्लांट मध्ये वळविले आहे. त्या पाण्यावर प्रक्रिया होण्याची गरज आहे.नदीच्या पाण्यातील चांगले पाणी सुद्धा एसटीपी प्लांटमध्ये जाते.

- सदर बाबत मा. आयुक्त सो. यांनी निरीचे अभिप्राय घेऊन कायम स्वरुपी उपाय योजना करणेबाबत सुचना केल्या.

तसेच श्री चव्हाणके (अधिक्षक अभियंता) : यांनी वरुणा नदीच्या लगत असलेल्या मलवाहिका दुरुस्त करण्याची गरज आहे.

४. श्री राजेश पंडित / श्री निंशिकांत पगारे: रामकुंडा मध्ये लेंडी नाल्याचे पाणी मिसळत आहे.

- मा. आयुक्त सो. यांनी पावसाची उघडीप विचारात घेऊन प्रत्यक्ष पाहणी करणार असल्याचे सुचित केले.

तसेच श्री. चव्हाणके यांनी स्मार्ट सिटी व्दारे रामवाडी पुल (लेंडी नाला) ते टाळकुटेश्वर पुल दरम्यानचे सुरु असलेल्या Sewerage line चे काम अपुर्ण असल्याचे व ते लवकर पुर्ण करणे बाबत सुचना केल्या.

- डॉ. नितीन गोयल, निरी, यांनी नाल्याव्दारे नदीत मिसळत असलेल्या सांडपाण्याच्या तात्पुरत्या उपाययोजना Natural Treatment Technology चा वापर करणे शक्य असल्याचे नमुद केले. सदरील उपाययोजनेसाठी लागणारा खर्च CSR मधुनही करता येईल, असे सुचविले.

५. श्री राजेश पंडित :- प्लास्टिक व रासायनिक कचरा नदीपात्रात मिसळू नये, याकरिता विद्यार्थी व नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे, असे नमूद केले.

- नाशिक मनपा घनकचरा विभागामार्फत कारवाई करणेत येते, तसेच Single use Plastic वापर करु नये या बाबत मा. आयुक्त सो यांनी वर्तमानपत्रात जाहिर आवाहन करणे तसेच या बाबत कठोर कार्यवाही करणे बाबत आदेशित केले.

तसेच श्री. आर. पी. सुर्यवंशी / श्री. एस.डी. मोहारे, Fild Officer, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी नाशिक शहरातील प्लास्टिक बंदी बाबत सुरु असलेली कारवाई इतर शहरांच्या मानाने चांगली असलेबाबत नमुद करुन त्यांच्या मार्फतही कार्यवाही सुरु असल्याचे नमुद केले.

६. श्री. मोरे, CEO, स्मार्ट सिटी यांनी Trash Skimmer मनपाच्या ताब्यात घेणेचा विषय बऱ्याच दिवसापासुन प्रलंबित असल्याबाबत विषय मांडला.

- त्या बाबत मा. आयुक्त सो. यांनी सदर बाबत यांत्रिकी विभागामार्फत त्वरीत कार्यवाही होणेकरिता आदेशित केले.

७. श्री राजेश पंडित :- यांनी शहरातील भुजल पातळी वाढविणेबाबत तसेच या करिता क्रेडाई व बिल्डर्स असो. यांची मदत घेता येईल या बाबत सुचित केले.

बैठकीच्या शेवटी उपआयुक्त श्री. मुंढे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

13/10/22

आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका, नाशिक